# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


जा.क्र.१०/एनजीपी/विकासनिधी/२०१८/ ४०५

दिनांक : 25 APR 2018

प्रति,

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, पुणे, मुंबई

विषय- पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील वैयक्तिक लेखा निधी (PLA), अंतर्गत महसुल निधी (IRG), विद्यार्थी विकास निधी मधुन खर्चाकरीता मान्यता देणेबाबत....

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थातंर्गत विविध कामकाजासाठी वैयक्तिक लेखा निधी ( PLA ), अंतर्गत महसुल निधी ( IRG ), विद्यार्थी विकास निधी मधुन खर्चास मान्यता देणेचे प्रस्ताव संचालनालयास थेट प्राप्त होत आहेत, तरी कोणत्याही संस्थेने सदरचे प्रस्ताव संचालनालयास थेट सादर करु नयेत.

संस्थेच्या वैयक्तिक लेखा निधी ( PLA ), अंतर्गत महसुल निधी ( IRG ), विद्यार्थी विकास निधी मधुन महत्वाचे कामाकरीता रक्कम मंजूर करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संबधित शासन निर्णयातील नमुद तरतुदीनुसार आवश्यक दस्तऐवज, विकास निधीचे प्राचार्यानी प्रमाणित केलेले विवरणपत्र, खर्चाचे अंदाजपत्रक, खरेदीसाठी मागविण्यात आलेली दरपत्रके, यंत्रसामुग्रीची दुरुस्ती करावयाची असल्यास कंपनीसोबत केलेल्या कराराची प्रत तसेच यंत्रसामुग्रीची दुरुस्ती/वार्षिक देखभाल करीता यंत्राच्या मूळ किंमतीच्या प्रतीवर्षी जास्तीत जास्त १०% च्या मर्यादेत सदर खर्च असणे आवश्यक इत्यादी आवश्यक दस्तऐवजासह सदर प्रस्ताव विभागीय कार्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहेत. तथापी असे निदर्शनास येते की, काही संस्था विभागीय कार्यालयात प्रस्ताव सादर न करता थेट या संचालनालयास प्रस्ताव सादर करतात. तरी सदर बाब आपले विभागांतर्गत असलेल्या शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थाचे प्राचार्यांचे निदर्शनास आणावी. तसेच संबधितांकडुन प्राप्त होणारे प्रस्तावांची आपले स्तरावर योग्य ती पडताळणी करण्यात यावी, संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रृटी असल्यास त्याची पुर्तता संस्थेकडुन करुन घेऊन तदनंतर आपले शिफारशीसह सदर प्रस्ताव या संचालनालयास सादर करावेत. तरी संस्थाकडुन थेट प्राप्त होणा-या प्रस्तावांवर या संचालनालयाकडुन कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई